# उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२९ /२०२५ — दि.२७/०९/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग विभाग, ठाणे तर्फे मे.संरचना कंपनी यांचेकडुन कल्याण माळशेज राष्ट्रीय महामार्गा वरील शहाड पुलावर सशक्तीकरण नुतनीकरणाचे (बेअरीग बदली करण्याचे) काम दिनांक २८/०९/२०२५ रोजी ००:०१ वाजेपासुन ते दिनांक १५/१०/२०२५ रोजी २४:०० वाजेपावेतो करण्यात येणार आहे. त्याकरिता शहाड पुलावरून कल्याण माळशेज मार्गावरील वाहतुक पुर्ण बद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** माळशेज कडुन कल्याणकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे ग्रामीण हद्दीत **डॅम फाटा, मुरबाड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही ठाणे ग्रामीण हददीत डॅम फाटा, बदलापुर रोडने बदलापुर – पालेगांव – नेवाळी नाका– मंलग रोड – लोढा पलावा/शिळ डायघर रोड/पत्रीपुल, कल्याण मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** मुरबाड कडुन शहाड पुलावरून कल्याण कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना ठाणे ग्रामीण हददीत **दहागांव फाटा (रायतागांव )** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने ही ठाणे ग्रामीण हददीत दहागांव फाटा ( रायतागांव) येथे डावीकडे वळुन वाहोली गांव – मांजर्ली – दहागांव – एरंजडगांव – बदलापुर – पालेगांव नेवाळी नाका मंलग रोड, लोढा पलावा/शिळडायघर रोड/पत्रीपुल कल्याण मार्गे इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** कल्याण कडुन मुरबाड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कल्याण वाहतुक उपविभाग हददीत **दुर्गाडी पुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने दुर्गाडी पुलावरून उजवी कडे वळुन पुढे गोविंदवाडी बायपास – पत्रीपुल – चक्की नाका मार्गे नेवाळी – पालेगांव – बदलापुर मार्गे मुरबाडकडे इच्छीत स्थळी जातील. |

**सदर पर्यायी मार्गावरुन जड–अवजड वाहनांना नमुद कालावधीत सकाळी ०६:०० ते सकाळी ११:०० वा. तसेच सायंकाळी १७:०० वा. ते २२:०० वा. पावेतो प्रवेश बंद राहील.**

सदर अधिसूचना **दिनांक २८/०९/२०२५ रोजी ००:०१ वाजेपासुन ते दिनांक १५/१०/२०२५ रोजी २४:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण/उल्हासनगर

नियंत्रण कक्ष, कल्याण/उल्हासनगर शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/–सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग,/पोनि उल्हासनगर, कल्याण वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.